visit - aavishkarfoundation.com
प्रत्येक सोमवारी प्रसिध्द होणारे निर्भिड विचारांचे साप्ताहिक

# कोल्हापूर वृत्त

Email- aavishkarsanjay@gmail.com
संस्थापक संपादक - संजय पवार (९८२२६७५७५०)
भारत सरकारच्या कार्यालयातील अधिकृत क्रमांक
RNI NO. MAHMAR / 2007 / 20553
वर्ष ५ / अंक ४ / शनिवार
दिनांक ९ एप्रिल २०११ / पाने ८ / किंमत ३/-(विशेषांक)
PRINTED MATTER

आपल्या सुखी जीवनासाठी
योग्य फायनांशिल नियोजन
करून घ्या.
अनिल पाटील (चिंचवाडकर)
मोबा. ९८५००८२८४९

## मा.जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते आविष्कारचा उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार प्रदान

# सर्वसामान्य माणसांना योग्य फायनांशियल प्लॅनींग करून देणारे अनिल पाटील (चिंचवाडकर)



कोल्हापूर जिल्ह्यात अनेक सर्वसामान्य मध्यमवर्गीय लोकांना त्यांच्या जीवनामध्ये आर्थिक नियोजनद्वारे त्यांची आर्थिक ध्येय, उदिष्टे, पार पाडून निश्चितपणे उज्जवल भवितव्याकडे वाटचाल करण्यासाठी आणि आर्थिक बचतीविषयी सखोल ज्ञान देणारे अनिल पाटील (चिंचवाडकर) यांना विमा व गुंतवणूक सेवा क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल 'उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार' प्रदान केला जात आहे. त्यानिमित्ताने....

आयुष्य हे सरळ रेषत कधीच धावत नसते. त्यात अडथळे हे असणारचं आहेत. समस्यांनी आपले आयुष्य घेरले जाणार आहे पण याच समस्या स्वतःला कणखर बनविण्यासाठी येत असतात. अशा समस्यात एक धोका आणि दुसरी संधी दडलेली असते. धोक्याकडे पाहिले तर आपला पराभव निश्चित असतो परंतु संधीचा वापर कृतीशिलतेत परिवर्तन केले तर हा विजय निश्चित असतो. समस्या आपल्यातील तेज, प्रतिमा व्यक्त करीत असतात. याच आशयाप्रमाणे अनिल पाटील यांनी कोणाच्याही कुबडयांचा आधार न घेता स्वतःच्या हिमतीवर भरारी मारली आहे. अनेक अडचणी अपमानाचे क्षण गिळून स्वतःची उंची वाढविण्यात ते यशस्वी झाले आहेत. घरची परिस्थिती हालाखीची. उच्च शिक्षण घेण्याचे मनात असून सुध्दा पैसा नाही म्हणून उच्च शिक्षणाकडे पाठ फिरवली. शेतीची कामे करीत गांधीनगर येथे दुध विक्री करून चिंचवाड ते कोल्हापूर हा खडतर प्रवास करीत महाविद्यालीन शिक्षण केले. याचबरोबर एस. टी. कामगार संघटना येथे दरमहा तीनशे रूपये पगारावर काम केले. त्यानंतर मराठा महिला ग्रामीण बीगर शेती सहकारी पतसंस्थेमध्ये कर्ज वसुली क्लर्क म्हणून नोकरी केले. १९८७ पासून एल. आय. सी. चे काम करण्यास सुरूवात केली. १९९३ साली इचलकरंजी अर्बन बँकेत क्लर्क म्हणून नोकरी स्विकारली. त्यानंतर अनिल पाटील यांनी जी जी कामे केली त्यामध्ये त्यांनी यश आले ते विमा मार्केटिंग क्षेत्रात. प्रामाणिकणा, सेवाभावी वृत्ती व आपुलकी, या त्रिसुत्रीने विमा क्षेत्रात सर्वोत्तम काम करीत होते. ग्राहकांना योग्य सेवा अधिक चांगल्या पध्दतीने देण्यासाठी कालांतराने बँकेतील नोकरीचा राजीनामा दिला आहे पूर्णवेळ एल.आय.सी.चे काम करण्यास सुरूवात केली.

अनिल पाटील यांनी आपल्या विमा क्षेत्रातील कार्यात अनेक चमकदार कामगिरी केल्या. यामध्ये अनेक ठिकाणी ट्रेनिंग घेऊन विमा क्षेत्रातील बारकावे टिपण्याचा प्रयत्न केला. अनिल पाटील यांनी एस. टी. सी. सातारा, एस. डब्ल्यू काळवीट इन्स्टिट्यूट पुणे, स्मार्ट ट्रेनिंग सेंटर, मुंबई, जे. टी. सी. पुणे, लाझरस डायस अकादमी, मुंबई, राजेश टागोर ट्रोनिंग सेंटर मुंबई, अडिया वर्ल-वाईल्ड ट्रेनिंग, अहमदाबाद, इन्स्टिट्युट ऑफ फायनांशियल, प्रोफेशनल असोसिएशन मुंबई, फायनांशियल प्लॅनिंग पोट पोलिओ मॅनेजमेंट एन. जे. फंड्स, रिलायंन्स फंड्सचे ई.डी.जी.ई.ट्रेनिंग आदि ठिकाणी प्रोफेशनल ट्रेनिंग घेतले.त्यांनी आपल्या समोर आलेल्या अनंत अडचणींन जीवनाच्या कॅनव्हॉसवर उमटिण्याचा प्रयत्न केला. आपलं दुःख बाजूला ठेवलं आणि इतरांच्या दुःखात सहभागी झाले. विमा क्षेत्रात करिअर म्हणून अनिल पाटील यांनी उडी मारली ती यशस्वी करून दाखविली. विमा क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल त्यांना अनेक सन्मान मिळालेले आहेत. यामध्ये बिमा रत्न पुरस्कार, बिमाभूषण पुरस्कार, शतकवीर पुरस्कार, गोल्ड क्लब पुरस्कार, सन २००५-२००६ मध्ये ९४९ शाखेत हप्ता निकषावर प्रथक क्रमांक मिळवला. आजपर्यंत २ हजार लोकांचे व्यवहारज्ञान विकसीत करून तब्बल ६० कोटींचा विमा व्यवसाय केला. अनेक मित्रांच्या सहकार्याने आणि आपल्या कार्यकुशलतेच्या जोरावर सन २००८ साली श्री पार्श्व इनव्हेस्टमेंट्स पोर्टफोलीओ मॅनेजमेंट म्युचअल फंड ॲन्ड इन्शूरंन्स ही फर्म सुरू केली. गुंतवणूक कशी करायची या संदर्भात तळागाळातील, मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांना माहिती देत आहेत. त्यांचे आर्थिक व्यवहारज्ञान विकसीत करून सुयोग्य पध्दतीने बचतीद्वारे एक शिस्तबध्द व सुखी, समृध्दी आनंदी जीवन सदैव प्रत्येकाच्या जीवनात कसे येईल याचे मार्गदर्शन देत आहे.

कोणत्याही महाविद्यालयात आर्थिक ज्ञानाविषयी माहिती मिळत नाही म्हणूनच भविष्यात गुंतवणूकीविषयी कार्यशाळा घेण्याचा त्यांचा मानस आहे. अनिल पाटील यांच्या सहकार्यामुळे अनेक वृध्द व त्यांच्या वृध्दापकाळात पुरेशा आर्थिक तरतुदीमुळे सुखी, समाधानाने जगत आहेत. अनेक तरूण उच्च शिक्षण आनंदाने घेत आहेत. अनेक तरूणी दिल्या घरी सुखी आहेत. याचं खरं गुपीत म्हणजेच 'योग्य वेळी योग्य बचती व नियोजनाचा सल्ला' त्यांच्या वडिलांना दिल्याने. जीवन क्षणभंगूर आहे. पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे; अस्तित्व कधी संपत हे माहित नसतं अशा अस्तित्व संपलेल्या विधवा स्त्रिया कोणत्याही आर्थिक विवंचनेनुसार गाडा चालवित आहेत. म्हणून अनिल पाटील यांचा अर्थविषय सल्ला फार मोलाचा आहे. अनिल पाटील हे सेवाभावी वृत्तीने काम करण्यासाठी पहिल्यांदा पसंती देतात. आपल्या कार्यातून वेळ काढून अनिल पाटील सामाजिक सेवेसाठी सुध्दा वेळ देऊ करतात. चिंचवाड येथील सृजनशक्ती श्रमीक फौंडेशनचे संचालक म्हणून तर भारतीय जैन संघटनेचे जिल्हा सेक्रेटरी म्हणून ते कार्यरत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात जैन समाजाच्या वतीने होणाऱ्या सर्व कार्यक्रमामध्ये ते अग्रभागी असतात. समाजाला उच्च दर्जा मिळाला पाहिजे यासाठी त्यांची धडपड सुरू असते. नवीन काही तरी करायचे, मात्र नवीन करताना जुन्याला विसराचे नाही असा स्वाभव असलेले पाटील आज आविष्कारचे सत्कारमूर्ती आहेत. त्यांच्या पुढील कार्यास मनापासून हार्दिक शुभेच्छा..!

आपल्या भविष्यातील समृध्द जीवनासाठी आर्थिक नियोजन करून घ्या.
चला... आजच फोन करा..
श्री पार्श्व इन्व्हेसमेंट्स
पोर्ट फोलिओ मॅनेजमेंट, म्युच्यूअल फंड्स ॲन्ड इन्शूरंन्स.
कार्यालय-५७१, शिवाजी पार्क, एस. टी. कामगार संघटना बिल्डींग, एस. टी. स्टॅन्ड, कोल्हापूर (२५३००८)
मा.अनिल पाटील (चिंचवाडकर)
मोबा.98500 82849
Email- licanilbpatil@yahoo.co.in


# आर्थिक नियोजन म्हणजे काय?

खरं तर चिंता आणि चिता यात फार फरक नसतो. दोघेही माणसाला एकप्रकारे जाळून टाकतात. चिता ही शरीराला अग्नी देऊन भस्मसात करते तर चिंता ह्या मनाला जाळत असतात. त्याचा परिणाम शरिराला भोगावा लागत असतो. म्हणून चिंतामुक्त आयुष्य जगण्यासाठी सुयोग्य नियोजन. नियोजन हे मानसिक, भावनिक, शारीरिक, सामाजिक, कौटुंबिक, अध्यात्मीक आणि आर्थिक अशा प्रत्येक ठिकाणी नियोजन करण्याची फार मोठी गरज आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आर्थिक नियोजन. आर्थिक नियोजन असेल तर बाकीच्या सर्वच ठिकाणी योग्य समतोल साधला जातो. त्याचा परिणाम जीवनात एक चिरंतन सुख आणि उदिष्टपूर्ण आयुष्य याच्या परिपूर्तीसाठी होईल. सारं जग पैशाभोवती फिरत आहे. प्रत्येकाचा अविभाज्य घटक आहे तो पैसा. प्रत्येक जण पैशासाठी अहोरात्र काम करीत असतो. पैशासाठी काही लोक वाटेल ते करायला तयार होतात.एकुणच पैसा प्रिय आहे म्हणून पैशाचे नियोजन महत्वाचे आहे.

**आर्थिक नियोजन म्हणजे काय?**


भविष्यातील आर्थिक गरजा, उदिष्टांसाठी वाढत्या महागाईनुसार योग्य वेळी पुरेसा पैसा निश्चित स्वरूपात उपलब्ध होण्यासाठी केलेले बचतीच्या माध्यमातून नियोजन. प्रथम भविष्यातील आर्थिक उदिष्टे व ध्येय निश्चित केली पाहिजेत. गरजा व जबाबदारी यांचा आरखडा तयार केला पाहिजे. माझ्या कुटुंबावर चांगल्या, वाईट परिस्थितीमध्ये परिणाम काय असू शकते याचे व्यवस्थापन करणे म्हणजेच आर्थिक नियोजन होय.

**आर्थिक नियोजनाचे फायदे :**


०१. कुटुंबामध्ये पैशाचा प्रवाह सतत राहतो.
०२. गरजा व इच्छा यांच्यात समन्वय साधला जातो.
०३.भविष्यातील प्रत्येक गरजांसाठी बचतीमुळे पुरेसा पैसा उपलब्ध होतो.
०४. फालतू खर्चांना आळा बसतो.
०५. बचतीमुळे कुटुंबामध्ये शिस्तबध्द जीवन आणि आदर्श कुटुंब पध्दती हीच शिस्त पिढ्यान पिढ्या पाळली जाते.
०६. कोणत्याही आपत्तीचा आर्थिक परिणाम कुटुंबावर होत नाही.

**आर्थिक नियोजनाबाबत गैरसमज :**

०१. आर्थिक साक्षरतेचा अभाव
०२. बचत ही गुंतवणूक न करणे
०३. चलनवाढ व महागाईचा परिणाम विचारात न घेणे
०४. भविष्यातील ध्येय धोरणांचा वेध न घेणे
०५. उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करणे




आपल्या सुखी जीवनासाठी योग्य फायनांशिल नियोजन करून घ्या.- अनिल पाटील
९८५००८२८४९




वरील प्रमाणे आपल्या समाजामध्ये आर्थिक स्तर दिसतात. प्रत्येकाची मानसिकता वेगवेगळी असते ती पुढीलप्रमाणे

**सामान्य जनता :- उत्पन्न - खर्च = बचत**

सर्वसामान्य जनता उत्पन्न आल्यानंतर खर्चास प्राधान्य देते. बचत नगण्य किंवा अजिबातच नाही. आजचं खा, मजा करा, कशाला उद्याची बात. या वृत्तीने ही लोक जगतं असतात. अल्पकालीन गरजांमध्ये अडकलेले दिसतात. कालांतरांना दिर्घ कालीन गरजा पुढे आल्यानंतर ऐनवेळी पैशाची जमवा जमव करताना दिसतात. वेळप्रसंगी उधारी, उसनवारी, जबरी व्याजाने पैसे घेणे, दान-दागिने विकणे, मालमत्ता विकणे असे प्रसंग स्वतःहून ओढवून घेतात. नियोजन शुन्य खचलेली मानसिकता पिढ्यानपिढ्या गरीबीकडे वाटचाल करताना दिसतात.

**मध्यमवर्गीय जनता :- उत्पन्न - बचत = खर्च**

मध्यमवर्गीय लोकांचे उत्पन्नातून बचत बाजूला काढून बाकी रक्कम खर्च केली जाते. बचतीला प्राधान्य दिले जाते. मात्र चलनवाढ व महागाई सारख्या वाळवीने आपले उत्पन्न भविष्यात घटवत असतात याची माहिती करून घेतली जात नाही. त्यामुळे भविष्यातील गरजांसाठी पैसा असतो मात्र पुरेसा नसतो. त्यांची बचत ही गुंतवणूक होत नाही.

**श्रीमंत वर्ग :- उत्पन्न - बचत - गुंतवणूक = खर्च**

हा वर्ग आलेल्या उत्पन्नातून बचत बाजूला काढतात. व ती गुंतवणूक करतात. भविष्यातील ध्येय धोरणांचा वेध घेतात. व त्यानुसार गुंतवणूकीचे नियोजन करतात. एक शिस्तबध्द जीवन जगताना दिसून येतात.

**गर्भ श्रीमंत वर्ग :- संरक्षण - उत्पन्न - बचत - गुंतवणूक = खर्च**

भविष्यातील येणारे उत्पन्न संरक्षित केले जाते. एक योजनाबध्द काम करीत असतात. पिढ्यानपिढ्या पैशाचा प्रवाह येत असतो त्यामुळे पैसा कधीही कमी पडत नाही.

**गुंतवणूक साधने :-**

आर्थिक दृष्या स्थैर्यता प्राप्त करून घेण्यासाठी प्रत्येकांनी विविध ठिकाणी गुंतवणूक करून ठेवावी. यामुळे भविष्यकाळात येणाऱ्या समस्येला, अडचणींना आपण चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकू. यामध्ये

राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतंसस्था, मुदत बंद ठेव, सेव्हींग खाते रिकरिंग योजना,........................................................ व्याजदर ६ ते ९ पर्यंत.

पोष्ट खाते - किसान विकास पत्रे, नॅशनल सेव्हिंग स्कीम, दरमहा रिकरिंग योजना, मंथली इनकम प्लॅन, दामदुप्पट ठेव योजना, .............व्याजाचा दर ८ ते ९ टक्के

आयुर्विमा कंपन्या - एडोमेंट प्लॅन, आजीवन विमा, युनिक प्लॅन, मनीबॅक,एक रक्कमीच्या पेन्शन योजना चिल्ड्रन्स प्लॅन ......व्याजाचा दर ८ ते १० टक्के

निरनिराळ्या कंपनींची एफ.डी. डिबेचर, पी.पी.एफ,इन्फ्रास्ट्रक्चर बॉन्डस,- ९ टक्के म्युच्यूअल फंडस - इनकम फंड, फेब्ट फंड, गिल्ड फंड, कॉल मनी, प्लोटींग रेट फंड, शॉर्ट टर्म फंड, मंथली इनकम प्लॅन,......व्याजाचा दर ७ ते १० टक्के
बॅलन्स फंड, डायव्हसी फंड, सेक्टर फंड, लार्जकॅप फंड, मिडकॅप फंड, इक्वीटी लिंक्ड सेव्हिंग स्कीम, ............................... दिर्घ मुदत १५ ते २५ टक्के पर्यंत
**म्युच्यूअल फंडातील गुंतवणूक अधिक सोयीनुसार व फायदेशीर करता येते.**

# आपत्ती व्यवस्थापन

जगातील अतिजलद आगगाडीमध्ये आग व वेगप्रतिबंधक व्यवस्था असते. सर्व विमानात हवाई छत्रीची व्यवस्था असते. सर्व मोठ्या जहाजामध्ये लाइफबोटीची व्यवस्था असते. याप्रमाणे प्रत्येकाच्या जीवनामध्ये आपत्ती व्यवस्थापन ही सर्वात मोठी गरज आहे. गंभीर अपघात, गंभीर अजारपण व मृत्यू, या गोष्टी आपल्या जीवनामध्ये कधीही घडू शकतात. नवनवीन येणारे रोग बर्ड फ्लयू, स्वाईन फ्लयू, एच. आय. व्ही. सारख्या सांसर्गीक रोगांचा प्रसार दिवसेदिवस वाढत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात व्यवसायात प्रचंड धावपळीमुळे व मानसिक ताण याचा परिणाम जीवनशैलीवर होत आहे. त्यामुळे आजरपणाचे प्रमाण वाढले आहे. वाढत्या वाहन संख्यामुळे तर अपघाताचे प्रचंड प्रमाण वाढले आहे.

आपण रोजच्या जीवनात जगत असताना भविष्याची काळजी करण्याचे सोडून देतो. मात्र तसे न करता वर्तमानकाळात आनंद घेत असताना भविष्यात दुःखाला सामोरे गेलो तरी ती ताकद आहे तशी राहीली पाहिजे यासाठी प्लॅनिंगची आवश्यकता असते. आपण आपल्या जीवनाचे नियोजन केले तर आपणाबरोबर आपले संपूर्ण कुटुंब सुखी तर राहील शिवाय बिनधास्त राहील.

**आयुर्विमा नियोजन :-** आपला जीवनविमा कौटुंबिक जबाबदारीनुसार आहे का? आपला जीवनविमा घेताना व्यावसायातिक कर्जे, लौकीक व्यवसायातिल दररोजचा खर्च लक्षात घेतला आहे का? मानवी जीवन मुल्यानुसार आपला जीवनविमा आहे का? मानवी जीवन मुल्य किती व कशी असू शकते याची माहिती घेतला आहात का? योग्य विमा म्हणजे आपण नसताना योग्य गरजांची निश्चित व्यवस्था होय.

**मेडिक्लोम पॉलीसी :-** आजच्या स्पर्धात्मक युगात प्रचंड धावपळ, मानसिक ताण तणाव याचा परिणाम जीवन शैलीवर पडून याशिवाय संसर्गजन्य रोगांचा वाढता फैलाव, औषधउपचारासाठी होणारा प्रचंड खर्च, यासाठी हवे योग्य नियोजन. पुरेशा औषध उपचार खर्चासाठी मेडीक्लोम पॉलीसी असावी.

**पर्सनल ॲक्सीडेंन्ट पॉलॉसी :-**

स्पर्धात्मक युग व वाढत्या वाहन संख्येने दररोज अचानक होणारे अपघात आपण रोजच वर्तमानपत्रात वाचत असतो. ही समस्या दिवसेदिवस वाढतच आहे. अशा घटनांमुळे शारीराची इजा, अपंगत्व किंवा मृत्यूसारखे प्रसंग घडतात. अशा प्रसंगी येणा औषधोपचारावरील खर्च प्रचंड असतो. बरेच वेळेस अपघातामध्ये प्रामुख्याने डोक्याच्या भागाला इजा होते व हॉस्पिटलच्या सुचनेनुसार प्रथम लाखो रूपये ॲडव्हांन्स भरावेत अशी सूचना येते. त्याशिवाय उपचार सुरू होत नाही. अशा प्रसंगी आपल्या कुटुंबाची अवस्था फार दयनीय होते. यासाठी आपली पी.ए. पॉलीसी काम करते. बरेच वेळेस अपघातामुळे तात्पुरते व कायमचे अपंगत्व येते. यासाठी आपल्या शरिराच्या भागानुसार नुकसान भरपाई विमा कंपनीकडून मिळते. याशिवाय जितके दिवस हॉस्पिटलमध्ये उपचार घेता त्याचे भरपाई मिळते.




**सुखी कुटूंब म्हणजे, कुटुंबाच्या सर्व गरजा पूर्ण होणे होय**

# गुंतवणूक करताना काळजी घ्या

०१. स्वकष्टाने मिळवलेला पैसा गुंतवताना तो गुंतविला जाणार आहे त्या कंपनीची संपूर्ण माहिती घ्यावी, कंपनीची स्थापना, कंपनीचा फंड, नफा, कोणत्या योजना वगैरे त्याची संपूर्ण माहिती घ्यावी.

०२. जी व्यक्ती तुम्हाला गुंतवणूकीचे साधन/योजना विकण्यास येते तेव्हा त्याची पार्श्वभूमी समजवून घ्या, त्या व्यक्तीकडे न पाहता कंपनी कोणती आहे ते पहा. त्या व्यक्तीस कंपनीविषयी किती माहिती आहे याची चाचपणी करा. ती व्यक्ती त्या कंपनीबरोबर किती वर्षे आहे याची माहिती घ्या

०३. एखादा एजंट एखाद्या योजनेबद्दल माहिती सांगत असताना प्रथम मोठ्या प्रमाणात फायदे सांगत असतो. अशावेळी त्या योजनेचे तोटे काय आहे हे विचारा. हे सांगता आले नाही तर स्वतःच्या लाभाकरीता सदर योजना विक्री करीत आहे असे समजा. त्या योजनेची मुळ माहिती पत्रके वाचून निर्णय घ्यावा.

०४. नवनवीन योजना बाजारात येतात त्याबाबत सखोल अभ्यास करून गुंतवणूक करावी. एखादी योजना घेण्यापेक्षा स्वतःच्या व गुंतवणूक विषयी ध्येय धोरणे ठरवा आणि त्यानुसार योजना घ्या.


०५. जेव्हा एखादा विमा प्रतिनिधी विमा योजना विक्रीसाठी येतो तेव्हा त्याला पुढील प्रश्न विचारा, त्याबाबत योग्य समाधान झाल्यावर योजनांची निवड करा. ( जीवन विमा म्हणजे काय?, कौटुंबिक जबाबदारी म्हणून काय?, ती पैशामध्ये किती असू शकते, व्यावसायिक असेल तर व्यवसायातील जबाबदारी किती ? व्यवसायातील कर्जे उधारी, लौकीक याचा विचार विमा घेताना केला जातो काय? मानवी जीवन मुल्य सिध्दांतानुसार विम्याचे नियोजन करतो आहे का? सर्व घटक विमा घेताना विचारात घेतल्यास आपण त्या योजनांचा स्विकार करू शकू.

०६. खाजगी क्षेत्रातील मार्केटिंग कंपन्या चेन सिस्टीम मधुन गुंतवणूक व विम्याची विक्री करत आहेत. अशा योजनांमधील बरीच रक्कम कपात करतात. व अशा योजनांपासून नंतरच्या सेवा कोणीही देत नाही. म्हणून अशा योजनापासून सावध रहावे असे वाटते.

७. शेअर बाजारातील त्रोटक ज्ञान किंवा दुसऱ्याने दिलेल्या टिप्सच्या अधारे गुंतवणूक करणे धोक्याचे असते. त्यापेक्षा म्युच्युअल फंडामध्ये दिर्घ मुदतीसाठी पण नियमितपणे थोडी गुंतवणूक केल्यास त्याचा चांगला नफा मिळतो.

**जीवनामध्ये प्रत्येक गोष्टीमध्ये नियोजन हवे. नियोजन असेल तर कितीही मोठे संकट आले तर त्यावर मात करता येते. नियोजन नसेल तर लहान लहान संकटेही डोंगराएवढी वाटतात. ती सोडविण्यासाठी प्रचंड मेहनत आणि कष्ट घ्यावे लागते.**

**चलनवाढीमुळे पैशाचे दिवसेदिवस बदलणारे (कमी होणारे) मुल्य. चलनवाढीचा दर ६ टक्के**



आपल्या कुटुंबाचे रक्षण करण्याकरीता विमा जरूरी

## संपादकीय....

# आपण आपले फायनांशियल प्लॅनिंग केले आहे काय?

आजचे मानवी जीवन हे पूर्णता धकाधकीचे आहे. माणूस घरातून बाहेर पडला आणि तो घरी परत सुखरूप येईल याची शाश्वती फारच कमी राहिलेली आहे. त्यामुळे असुरक्षितता मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. कोणत्याही ठिकाणी माणूस आर्थिक बाबतीत सुरक्षीत असेल तर त्याला फारशी चिंता करण्याची गरज नाही. त्यामुळे आर्थिक प्लॅनिंग फार महत्वाचे आहे. घरात लागणाऱ्या वस्तु असोत, कार्यालयात लागणाऱ्या वस्तु असोत किंवा आपला दैनंदिन खर्च याचे प्लॅनिंग चांगल्या प्रकारे केले तर आपणास किरकोळ संकटांना सुध्दा सामोरे जावे लागत नाही. जर संकटे आली तर डगमगत नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थीत प्लॅनिंग आवश्यक आहे. कधी कधी घरातील कर्ता पुरूष आजारी पडतो आणि घरातील आर्थिक यंत्रणा कोलमडून जाते. त्यामुळे घरातील सर्व सदस्यांना त्याचा त्रास सोसावा लागतो. एखादा अपघात झाला तर अनेक लोक एकमेकांकडून उसने पैसे घेऊन दवाखान्यात भरताना दिसतात असे अनेक प्रकार दैनंदिन जीवनात पाहयला मिळत असतात. मात्र माणूस तो पहातो त्यावर तोडगा काढणारी मात्र काहीच माणसे असतात. आपल्या जीवनाला आणि कुटुंबाला सुरक्षित असे बनविण्यासाठी आपण सज्ज राहीले पाहिजे. आपल्या नंतर सुध्दा आपल्या कुटुंबाची वाताहात होता कामा नये यासाठी योग्य नियोजन आजच केले पाहिजे. ते नियोजन करण्याची जबाबदारी कुटुंबप्रमुख म्हणून आपण उचलली आहे काय ते तपासून पहा. मानवी जीवन हे क्षणभंगूर आहे. त्यामुळे जीवनात आला आहात तर समाजासाठी काही तरी करून जा. असा एक संदेश सुध्दा यामामध्यमातून देण्यात येत आहे. योग्य प्रकारे नियोजन केल्याने माणसाची प्रगती होते. त्याला जीवनाचा आनंद चांगल्या प्रकारे घेता येतो. म्हणून कोणत्याही स्थितीत प्लॅनिंगला महत्व देणे गरजेचे आहे. आज विविध ठिकाणी विविध घटना सातत्याने घडत असताना पहातो. या घटनांचा मागोवा घेतला तर आपण किंवा आपले कुटुंब सुरक्षित आहे का? याची खात्री करा. विमा क्षेत्रातील विविध पॉलीसी आपल्या कुटुंबाकरीता घेऊन ठेवायला हरकत नाही. आपली बचत नेहमी असली पाहिजे. बचतीमुळे अनेक लहान लहान संकटे सुध्दा मार्गी लागू शकतात. त्यामुळे जीवनात आर्थिक प्लॅनिंग करताना कधीही मागे-पुढे पाहू नका. ज्याची गरज आहे त्याला योग्य ते स्थान देण्याची भूमिका आपली ठेवा म्हणजे पुढील जीवनात निश्चितपणा जाणवेल.

# कामगारांच्या कुटुंबियाचे भवितव्य उज्वल घडविणारे राजकुमार छाबडा



२१ व्या गतीमान शतकात आपल्या व्यवसायामध्ये अनेक बदल होत आहेत. व्यावसाय स्वरूप बदलत आहे. प्रचंड स्पर्धेमध्ये यशस्वी होण्यासाठी एक उत्तम व्यवस्थापनाची गरज असते. व्यवसायातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे आपला कर्मचारी वर्ग. अशा कर्मचाऱ्यांचे भवितव्य उज्वल असेल तर व्यावसायाचे भवितव्य उज्वल घडू शकते. आम्ही श्री अनिल पाटील यांचेकडून मालक कामगार विमा योजना ऑगस्ट २००५ मध्ये स्विकारली. सन २००७ मध्ये आमचे कर्मचारी सर्जेराव वारके यांचे अकस्मात निधन झाले. वारके यांची घरची परिस्थिती हालाखीची. घरात येणारे उत्पन्न बंद झाले. वृध्द माता-पित्यांच्या समोर काळाकुट्ट अंधार पसरला. जगायचे कसे हा प्रश्न निर्माण झाला. श्री. अनिल पाटील यांनी अथक परिश्रम करून शाहूपुरी पोलिस स्टेशन आणि डी. वाय. एस. पी. ऑफीसकडून सर्व कागदपत्रांची जुळवाजुळव करून १ लाख ५४ हजारांचा क्लेम मंजुर करून त्या वृध्द माता-पित्यांना आर्थिक आधार दिला. नुसते आश्रू पुसण्यापेक्षा त्या कुटुंबाला आर्थिक अधार देऊन सांत्वन करण्याचे काम अनिल पाटील यांच्या माध्यमातून केले. अनिल पाटील सातत्याने योग्य योजना समजावून सांगतात. तदनंतर त्या बाबत योग्य सेवाही चांगल्या प्रकारे देतात. अशा निस्वार्थी पणाने काम करणाऱ्या अनिल पाटील यांना आविष्कार फौंडेशनमार्फत उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार देऊन गौरव होत आहे हे ऐकून आनंद झाला. चांगल्या व्यक्तीमत्वाचा गौरव होत आहे याबाबत समाधान वाटले. त्यांच्या कार्यास असे अनेक गौरव प्राप्त व्हावेत हीच सदिच्छा..!

- श्री. राजकुमार व. छाबडा, (राज मोडिकल्स, गांधीनगर)


आपल्या भविष्यातील समृध्द जीवनासाठी
आर्थिक नियोजन करून घ्या.
चला... आजच फोन करा..
श्री पार्श्व इन्व्हेसमेंट्स
अनिल पाटील (चिंचवाडकर)
मोबा. ९८५००८२८४९

# तरूणपणातच करावी लागते रिटायरमेंट प्लॅनिंग

म्हातरपण येण्यासाठी अक्कल लागत नाही पण म्हातरपण व्यवस्थित जाण्यासाठी तरूणपणी अक्कल खर्च करावी लागते. आपल्या समाजात ७२ टक्के वृध्द लोकांना पडेल ते काम मुलांच्यावर आणि वृध्दाश्रमवर अवलंबून रहावे लागत आहे. म्हणून वृध्दापकाळचे नियोजन फार महत्वाचे आहे. " खिशात असेल पैसा तर लोक म्हणतील या बसा " पण पैसा नसेल तर काडीचीही किंमत नसते. सर्वांना अडगळ वाटू लागते. अपमान, हेटाळणी, दुर्धर अजारपण, नैराश्यासह सतत दुसऱ्यांवर अवलंबून रहावे लागेल. आयुष्याच्या संध्याकाळी आनंदाने आणि सुखाने जगण्यासाठी पैशाच्या प्रवाहाची गरज भासते.

**रिटायरमेंट प्लॅनिंगची गरज :-**


०१. वाढत जाणारा महागाई व राहणीमानाचा खर्च
०२. वाढते वैद्यकीय खर्च
०३. वाढते आयुष्यमान
०४. पेन्शन नसणाऱ्या नोकऱ्या
०५. एकत्र कुटुंब पध्दतीचा ऱ्हास
०६. धावपळ व स्पर्धात्मक युगात काम कमी वर्षे व रिटायरमेंट जादा वर्षे

**रिटायरमेंटसाठी आवश्यक बाबी :-**

०१. रिटायर कोणत्या वर्षी होणार
०२. आजचा खर्च किती? रिटायरमेंट नंतर खर्च किती असणार?
०३. रिटायरमेंटनंतर नियमित उत्पन्नासाठी किती फंड आवश्यक?
०४. पेन्शन किती वर्षे असावी?
०५. आपल्या पश्चात जीवनसाथीसाठी किती पेन्शन असावी?
०६. रिटायरमेंटनंतर वैद्यकीय फंड, तातडीचा फंड, राहणीमान ठिकाण, संपत्ती व्यवस्थापन, रोख संपत्ती, गुंतवणूक धोरण अराखडा तयार करणे.
०७.रिटायरमेंटवेळी कौटुंबिक स्थिती

| वय - सध्याचा खर्च | रिटायरमेंटचे वय | दरमहा पेन्शन | वयोमर्यादा | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| ३० - १००००/- | ५५ वर्षे | ४२९१८ | ८५ वर्षे | २.३८ कोटी |

# महागाईमुळे बदलणारे पैशाचे मुल्य (महागाई दर ६ टक्के




# चाईल्ड एज्युकेशन प्लॅनिंग महत्वाचे



गोड, मोहक, निरागस व सभोवताली सदैव आनंद पसरविणाऱ्या मुलांवर प्रत्येकजण प्रेमाचा वर्षाव करीत असतोच. प्रत्येक आई बाबांना वाटत असतं की आपली मुले यशस्वी व्हावीत. प्रत्येकजण आपल्या मुलांना सदैव सुखी ठेवण्यासाठी धडपडत असतो. आजकाल मुलांचे करिअर घडवणे हा पोरखेळ नाही. " करिअर घडविण्यासाठी एक नियोजन, दूरदृष्टी, आणि सातत्य आणि मला कितीही हाल अपेष्टा सोसाव्या लागल्या तरी चालतील पण तुझे भवितव्य घडविणारच असे ध्येय " मुले यशस्वी होण्यासाठी उत्तम संस्काराची व उच्च शिक्षणाची गरज भासते. आजच्या बदलत्या काळात उच्च, दर्जेदार, शिक्षणाबरोबर संस्कार ही विकत घ्यावे लागतात. मुलांचे शैक्षणिक ध्येय धोरण आखावे त्यानुसार त्या त्या शिक्षणासाठी लागणारा सध्याचा खर्च व भविष्यात येणारा खर्च याचा ताळमेळ विचारात घेणे गरजेचे आहे. वाढणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रातील महागाईमुळे चिंता करायला आजपासून सुरूवात करा व मुलांच्या भवितव्यानुसार योग्य आर्थिक नियोजन करा. शैक्षणिक क्षेत्रातील भवितव्याचा वेध घेतल्यास खालील प्रमाणे नियोजन करणे गरजेचे ठरेल. दहावी, बारावी नंतर खऱ्या अर्थाने मुलांचे शिक्षण चालू होते त्यामुळे उच्च शिक्षण घेताना पालकांना मोठी कसरत करावी लागते. या कसरतीतून मुक्त व्हावे असे वाटत असेल तर नियोजन केले पाहिजे. आज आपले मुल एक -दोन वर्षाचे असेल तर पुढील वीस वर्षाची तरतूद करून ठेवावी लागेल. ज्यावेळी ते मुल उच्च शिक्षण घेण्यासाठी तयार असेल त्यावेळी आपल्याकडे पैसा असेल. मुलांची स्वप्ने हवेत विरून जाऊ नयेत म्हणून पालकांनी जागृतपणे कार्य केले पाहिजे. आज आपल्या मुलांच्या नावे काही केले तर भविष्यातील शिक्षणाची सर्वात मोठी चिंता मिटेल या वृत्तीने आपण काम केले पाहिजे. मुलांच्या परदेशी शिक्षणाचा खर्च तर पालकांना न परवडणारा असतो. त्यामुळे मुलांच्या शिक्षक्षाचे नियोजन आजच केले तर उद्या मुले चांगले शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहतील.

इंजिनिअर डॉक्टर सांयटीस्ट
बिझनेसमन एम.बी.ए. सी.ए. ॲक्टर
आर्किटेक्ट फॅशन डिझायनर

**काय असेल आपल्या पाल्याचे भवितव्य ? एक आदर्श पिता या नात्याने भविष्यातील ध्येयधोरणांचा वेध घेऊन आजच नियोजन करा भविष्यातील गरज खालीलप्रमाणे असेल.**

| | सध्याचा खर्च | ५ वर्षानंतर | १० वर्षानंतर | १५ वर्षानंतर |
|---|---|---|---|---|
| इंजिनिअर | ५ लाख | ७,०१,२७६ | ९,८३,५७६ | १३,८९,५१६ |
| डॉक्टर | १५ लाख | २१,०३,८२८ | २९,५०,७२७ | ४१,३८,५४७ |
| एम.बी.ए. प्रोफेशनल कोर्सेस | ८ लाख | ११,२२,०४१ | १५,७३,७२१ | २२,००,२२५ |
| परदेशी शिक्षण | २० लाख | २८,०५,१०३ | ३९,३४,३०३ | ५५,१८,०६३ |
| लग्न | ७ लाख | ९,८१,७८६ | १३,७७,००६ | १९,३१,३२२ |

महागाई वाढ दर ७%

करिअर घडवणे पोर खेळ नाही...
हवे उत्तम संस्कार व दर्जेदार शिक्षण...




जोखीम घटक :- म्युच्यूअल फंड आणि रोख्यांमधील गुंतवणूक बाजारातील जोखमींच्या अधिन आहे. आणि फंडाचे निव्वळ मालमत्ता मूल्य रोखे बाजारावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांवर आणि बलांवर अवलंबून असून वर किंवा खाली जाऊ शकते. योजनेची उदिष्टे गाठली जातील याची खात्री दिली जाऊ शकत नाही. प्रायोजक/म्युच्यूअल फंड/योजना/एएमसी यांची मागील कामगिरी भविष्यातील निष्कर्षाची सूचक असेलच असे नाही. युटीआय पध्दतशीर गुंतवणूक योजना गुंतवणूकीचा एक मार्ग आहे आणि तो कोणत्याही प्रकारे युटीआय म्युच्यूअल फंड योजना आणि त्यांच्या भविष्यातील परिणामांचे आणि परताव्याचे निदर्शक नाहीत. अशी ही परिस्थिती असू शकेल की जेव्हा उत्पन्नाचे समान वाटप करता येणशर नाही. कोणत्याही संबंधीत कालखंडात या देशात अस्तित्वात आलेल्या कायद्यांच्या अधीन. दिलेल्या आश्वसनांची आणि वचनांची असल्यास पुर्तता आहे. क्रेडिट, व्याजदर, तरलता, अंदाजपत्रकातील त्रुटी, व्याजदर, स्वॅप्स आणि फॉरवर्ड रेट ॲग्रीमेंट यांच्या निगडीत जोखमीच्या अधीन योजना आहेत. की इन्फॉरमेशन मेमोरंण्डम कम ॲप्लीकेशन फॉर्म आणि ऑफर डॉक्युमेंटच्या प्रतीसाठी कृपया जवळच्या युटीआय म्युच्यूअल फंड शाखेशी संपर्क करावा. गुंतवणूक करण्यापूर्वी कृपया ऑफर डॉक्युमेंट जरूर वाचा.

# मालक-कामगार विमा योजना

- आपल्या व्यावसायाची प्रगती दिवसे दिवस वाढत आहे?
- ज्या कामगारांचे आयुष्य आपल्या व्यावसाय वाढीसाठी खर्च करीत आहे.
-ज्यांच्यशिवाय आपल्या व्यावसायाची प्रगती होऊ शकत नाही.
- जे प्रगतशील व्यावसयातील महत्वाचे घटक आहेत
- अशा कामगारांचे भवितव्य उज्वल कराल तर व्यावसायाचे भवितव्य उज्वल घडवतील. - मालक -कामगार विमा म्हणजे आपला व्यवसाय व कामगार यांचे उज्वल भवितव्याची गॅरंटी होय. - प्रा. फंडासारखी योजना, विमा संरक्षण, आयकर सवलत, करमुक्त परतावा, - मालक -कामगार संयुक्त विमा योजना, कमीत कमी कितीही कामगारांसाठी करता येते. - आजच्या स्पर्धात्मक काळात दर्जेदार कामगार हेच यशस्वी उद्योजकांचे भागीदार आहेत.।

## आपण स्वत:ला कधी खालील प्रश्न विचारले का?

०१. आपण आपली आर्थिक उदिष्टे निश्चित केली आहेत का?
०२. भविष्यातील ध्येय धोरणांचा अंदाज कधी घेतला आहात का?
०३. चांगल्या आणि वाईट परिस्थीतीमध्ये आपल्या कुटुंबाच्या गरजा काय असू शकतात, याचा आपण अंदाज घेतला आहे का?
०४. वाढत्या महागाईने आपल्या जीवनावरील परिणाम काय असू शकतो?
०५. आपल्या उत्पन्नातून बचत बाजूला काढून ठेवता का? सदर बचतीची गुंतवणूक होते का?
०६. उद्याचे उत्पन्न तुम्ही आजचं खर्च करीत आहात काय?
०७. तुमच्यासाठी भविष्यात उत्पन्न मिळवून देईल अशा प्रकारचा गुंतवणूक निधी उभारत आहात का?
०८. आपल्या येणाऱ्या उत्पन्नातून खर्चाचा कार्यक्षपणे मेळ घातला का? नेहमीचा खर्च, हंगामी खर्च, अचानक येणारे मोठे खर्च याचा नियोजन कसे घालता?
०९. गुंतवणूक माध्यमांची ओळख आपण करून घेतली आहात का?

# मानवी जीवनस्तर

कधीही ....
केव्हाही.....
कुठेही येऊ शकते मृत्यू... आजारपण...अपघात..!

**LEARNER** — प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण — वय १ ते २०

**EARNER** — करीअर स्टार्ट — वय २० ते २५

**PARNTER** — जीवनसाथीचे आगमन, नवीन जबाबदारीची सुरूवात — वय २५ ते ३०

**PERENTS** — शैक्षणिक खर्च नर्सरी फी लहान मुलांचे रिक्षा भाडे ट्युशन फी खर्च वाढतो — वय ३० ते ४०

**PROVIDER** — मुलांचे उच्च शिक्षण, शिक्षणा साठी डोनेशन, कॉलेज फी, वाढत्या महागाईचा विचार करा आणि आजच योग्य नियोजन करा... — वय ४० ते ५८

**EMPTY NESTONER** — रिटायर — वृध्दापकाळात उत्पन्न बंद, खर्च मोठा पैसा असेल तर वृध्दापकाळ आनंदाचा. नसेल तर हेळसांड औषधोपचार मिळत नाही शरीर साथ देत नाही, काम कमी, दुर्धर अजार घेऊन जगावे लागते... — वय ५८ ते ८०

## वाढता खर्च

# कुटुंबाचे आर्थिक नियोजन करण्यासाठी अनिल पाटील यांचे मार्गदर्शन महत्वाचे

### - युवा उद्योजक आणि यश बेकर्सचे रावसाहेब वंदुरे यांचे प्रतिपादन



आज समाजात आर्थिक स्वरूपात अस्थिरता निर्माण झाली आहे. गरीब गरीब होत आहे, श्रीमंत श्रीमंत होत आहे. अशा परिस्थितीत मध्यमवर्गीयांनी आपली आर्थिक पातळी खालवू नये म्हणून आर्थिक नियोजन करण्याची नितांत गरज आहे असे प्रतिपादन युवा उद्योजक आणि यश बेकर्सचे मालक रावसाहेब वंदुरे यांनी केले.

आनिल पाटील यांच्याविषयी बोलताना वंदुरे म्हणाले की, पाटील यांनी अनेक कुटुंबाना आर्थिक उन्नतीसाठी मार्गदर्शन केले आहे. ते जे काही काम करतात त्यामध्ये सामाजिक भाव नेहमी राहीला आहे. दुसऱ्यांना मदत करायची. भले आपणास चार पैसे कमी मिळो या वृत्तीने त्यांनी गेली दोन दशके काम केले आहे. विमा क्षेत्रात अत्यंत चांगली कामगिरी त्यांनी केली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी त्यांचा योग्य सन्मान झाला.

अनिल पाटील यांनी आर्थिक नियोजन आणि विमा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्यामुळे इचलकरंजी येथील आविष्कार फौंडेशनच्या शाखेने त्यांना उत्कृष्ट कार्य गौरव हा पुरस्कार दिला. पाटील यांनी केलेल्या कामगिरीचे फळ म्हणून या पुरस्काराकडे पाहिले तर वावगे ठरू नये. गरीबीवर मात करीत अनिल पाटील यांनी आपल्या जीवनाची सुरूवात केली. अत्यंत कष्टमय परिस्थितीला त्यांनी तोंड दिले. कोणतेही संकट आले तर त्यामध्ये यश मिळवायचे अशी भूमिका घेऊन अनिल पाटील काम करीत आहेत. त्यामुळे त्यांना यश मिळत गेले व आजही मिळत आहे. या क्षेत्रात कोणी कोणाला फसवू नये अशी त्यांची रास्त भूमिका आहे. त्यामुळे आपणाकडून जेवढी शक्य तेवढी मदत करण्याचा ते प्रयत्न करीत असतात. आजचा हा विशेषांक प्रकाशन म्हणजे एक सामाजिक जबाबदारीचे भान असेच म्हणावे लागेल. कारण हा अनिल पाटील यांचा नाही तर नियोजनाचा अंक प्रकाशीत केला आहे.


# योग्य गुंतवणूक मार्गदर्शक अनिल पाटील



आज सर्वत्र सहकाराचे जाळे दिसत आहे. सहकारामुळे अनेकांचे भवितव्य उज्जवल झाले आहे. पण काही विघातक मंडळीमुळे आज कित्येक पतसंस्था, सहकारी बँका बंद पडल्याने सर्वसामान्यांचे कोट्यावधी रूपये अडकलेले आहेत. सर्वसामान्य लोकांना पैसा कुठे गुंतवायचा हा प्रश्न भेडसावत आहे. अनेक मार्केटिंगमधील कंपन्या सर्वसामान्य लोकांना दुप्पटी-तिप्पटीच्या नावाखाली लुबाडले जात आहे. या सर्वसामान्य लोकांना गुंतवणूकीविषयी मोलाचे मार्गदर्शन श्री. अनिल पाटील करीत आहेत. विशेषता आर्थिक नियोजनावर भर देऊन त्यानुसार सल्ला देतात. अशा सल्ल्यांची सर्वांनाच गरज आहे. सर्वसामान्य लोकांनी आपल्या कष्टाचा पैसा योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने अनेक ठिकाणी गुंतवणूक अडकून पडलेली आहे. त्यामुळे कोणत्याही ठिकाणी गुंतवणूक करायची म्हटले की पहिल्यांदा नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी अनिल पाटील यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल.

**श्री. किरणसिंह पाटील, जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग १, सातारा**

# सर्वोत्तम इन्व्हेसमेंट प्लॅनिंग करणारे चिंचवाडचे अनिल पाटील - प्रेमचंद जसुजा




आजच्या धकाधकीच्या युगात प्रत्येकांच्या गरजानुसार नियोजनबध्द गुंतवणूक आराखडा तयार करणे प्रत्येक व्यापाऱ्याला गरजेचे आहे. जीवनस्तरानुसार सर्वांच्या गरजा बदलत असतात. महागाईमुळे खर्च वाढतो, उतारवयात उत्पन्न कमी होते. यासाठी सर्वांनाच गुंतवणूकीचा आराखडा तयार करणे गरजेचे ठरते यासाठी चिंचवाडचे अनिल पाटील यांचे मार्गदर्शन घेणे सोयीचे ठरेल. अनिल पाटील यांना त्यांच्या पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा.!

# आर्थिक नियोजनाचे व्यावहारज्ञान विकसीत करणारे अनिल पाटील - सुनिल नागावकर



आजच्या तंत्रज्ञान आणि स्पर्धात्मक युगात पैशाची निर्मिती प्रचंड पटीत होत आहे म्हणून बचत गुंतवणूक व खर्च यांची योग्य सांगड घालून सर्वोत्तम नियोजनाची गरज भासते. गुंतवणूक व आर्थिक व्यावहारज्ञानाबद्दल सखोल मार्गदर्शन कोणत्याही महाविद्यालयात मिळत नाही. त्यामुळे आर्थिक नियोजनाचे ज्ञान विकसीत करणारे म्हणून अनिल पाटील यांचेकडे पहावे लागेल. असे मत चार्टर्ड अकौंटंट सुनिल नागावकर यांनी व्यक्त केले. आजचे बालपण उद्याचे तरूणपण असते. आजचे तरूणपण उद्याचे वृध्दत्व असते. जाणाऱ्या प्रत्येक दिवसाबरोबर आपला एक दिवस आयुष्य कमी होत आहे. परंतु जेवढ्या लवकर आर्थिक नियोजनाला सुरूवात करणार तितके चांगले आर्थिक नियोजन होते. एखाद्या राष्ट्राला, कंपनीला आर्थिक आराखडा जसा तयार केला जातो तसा अर्थाजन करणाऱ्या प्रत्येकाला आर्थिक नियोजनाची गरज भासते. आपले उत्पन्न, वय, व्यवसाय व गरजा यांची योग्य सांगड घालून आर्थिक नियोजन करण्याची उत्कृष्ट काम श्री. अनिल पाटील करीत आहेत. त्यांना आविष्कार फौंडेशन, हातकणंगले तालुका शाखेचा उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कारास ते पात्र आहेत. भविष्यकाळात त्यांना असे अनेक पुरस्कार मिळावेत ही इच्छा. त्यांच्या उज्जवल कार्यास हार्दिक शुभेच्छा. !

# उत्तम फायनांशिल प्लॅनिंग करून देणारे अनिल पाटील - डॉ. रविंद्रकुमार खोत



वैद्यकीय व्यवसाय हा प्रचंड धावपळीचा ठरू पहात आहे. नवीन नवीन आव्हाने, बदल, नवीन तंत्रज्ञान व संशोधन या गोष्टीवर डॉक्टरांचा बराचसा वेळ खर्च होतो. खरं तर डॉक्टराची बुध्दीमत्ता हेच भांडवल असते. नवीन तंत्रज्ञान व हॉस्पिटल यावर प्रचंड पैसा व वेळ खर्च होत असतो. त्याबरोबरच भविष्यातील निरनिराळ्या गरजांचे नियोजन करूणे हे फार महत्वाचे आहे. भविष्यातील आर्थिक उदिष्टये ठरवून त्यानुसार आर्थिक नियोजन करण्यासाठी योग्य प्रकारचे मार्गदर्शन करणारे अनिल पाटील यांनी अनेक लोकांना गुंतवणूकीचे चांगले सल्ले दिले आहेत. त्यांच्या बुध्दीमत्ता व कौशल्याच्या जोरावर त्यांना आविष्कार फौंडेशनकडून उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!

**आपल्या भविष्यातील समृध्द जीवनासाठी आर्थिक नियोजन करून घ्या.**

**चला... आजच फोन करा..**

## श्री पार्श्व इन्व्हेसमेंट्स

**पोर्ट फोलिओ मॅनेजमेंट, म्युच्यूअल फंड्स ॲन्ड इन्शुरन्स.**

**५७१, शिवाजी पार्क, एस. टी. कामगार**

**संघटना बिल्डींग, एस. टी. स्टॅन्ड, कोल्हापूर**

**मा.अनिल पाटील (चिंचवाडकर) मोबा. ९८५००८२८४९**

**email- licanilbpatil@yahoo.co.in**

# अनिल पाटील यांच्या कार्याची क्षणचित्रे

## आमची सेवा ; जीवनाबरोबर आणि जीवनानंतरसुध्दा...



श्री. अनिल पाटील यांना शाखेत तृतीय क्रमांक आल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सत्कार करताना शाखा अधिकारी, विकास अधिकारी व मार्केटिंग मॅनेजर इत्यादी.



कै. हिदुराव सूर्यवंशी हे पॉलीसी घेतल्यानंतर अवघ्या १२ व्या दिवशी मृत्यू झाला. पॉलीसीच्या रक्कमेचा चेक त्यांच्या कुटुंबियांना प्रदान करताना अनिल पाटील व इतर



श्री. अनिल पाटील हे चेअरमन क्लब मेंबरशिप प्रमाणपत्र स्विकारताना सोबत मॅनेजर, सेल्स मॅनेजर व इतर अधिकारी



कै. जीवनधर चौगुले यांच्या विमा रक्कमेचा धनादेश त्यांच्या कुटुबियांना प्रदान करताना श्री. फडणीस, श्री. सी. एच. पन्हाळकर, सोबत अनिल पाटील




श्री. अनिल पाटील हे बिमाभूषण पुरस्कार एल. आय. सी. च्या सिनिअर डिव्हिजनल मॅनेजर, मार्केटिंग मॅनेजर व इतर अधिकारी.



ओरियंटल इन्शूरंन्स कंपनीचा व्यक्तीगत अपघात विमा पॉलीसीचा चेक बाबूराव कावले वळीवडे यांना प्रदान करताना संस्थेचे पदाधिकारी सोबत अनिल पाटील

आपल्या भविष्यातील समृध्द जीवनासाठी आर्थिक नियोजन करून घ्या.
चला... आजच फोन करा..
श्री पार्श्व इन्व्हेसमेंट्स
पोर्ट फोलिओ मॅनेजमेंट, म्युच्यूअल फंड्स ॲन्ड इन्शूरंन्स.
५७१, शिवाजी पार्क, एस. टी. कामगार
संघटना बिल्डींग, एस. टी. स्टॅन्ड, कोल्हापूर
मा.अनिल पाटील (चिंचवाडकर) मोबा. ९८५००८२८४९
email- licanilbpatil@yahoo.co.in



कै. मधुकर चक्रवर्ती यांच्या कुटुबियांना विम्याचा चेक प्रदान करताना श्री.फडणीस अनिल चिंचवाडे, राजू मुजावर सोबत अनिल पाटील व इतर

" कोल्हापूर वृत्त " हे पत्र मुद्रक सुनिल पांडूरंग सरनोबत यांनी प्रकाशक व मालक संजय व्यंकाप्पा पवार यांचेकरीता नवरंग ऑफसेट, १५५१, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे छापून आयोध्या अपार्टमेंट, बिल्डींग नं. ६४, प्लॅट नं. १४ पहिला मजला, अंबाई टॅक,कोल्हापूर (महाराष्ट्र ) येथून प्रसिध्द केले संस्थापक संपादक - संजय व्यंकाप्पा पवार